# जिल्हा परिषद रत्नागिरी
## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरभवन
# समाज कल्याण विभाग

समता न्याय एकात्मता

| E mail-dswozpsj.ratnagiri@maharashtra.gov.in | दूर. क्रमांक-०२३५२-२२२३९१ |
|---|---|
| जा.क्र. रजिप/सकवि/अपंग कक्ष/मॅट्रिकोत्तर अ.शिष्य./ /२०१९ | दिनांक - /०२ /२०१९ |


**स्मरण पत्र**

प्रति,

रेगल कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट & टयुरिझम,
मु.पो.कोढये, गुहागर रोड,
ता.चिपळूण, जि.रत्नागिरी

**विषय- मॅट्रिकोत्तर अपंग शिष्यवृत्तीचे प्रस्ताव सन २०१८-१९ करीता ऑनलाईन व ऑफलाईन सादर करणेबाबत.**

**संदर्भ - १. या कार्यालयाकडील पत्र क्र.जिसकअ/रजिप/शिष्य/१९२७/ २०१८-१९, दिनांक ०७.०९.२०१८.**

**२. मा.आयुक्त,अपंग कल्याण महाराष्ट्र,राज्य पुणे यांजकडील पत्र क्र. अकआ /प्र-७/शिष्यवृत्ती/ प्रदान/२०१८-१९/१२३,दि.०३.०१.२०१९.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविणेत येते की, मॅट्रिकोत्तर अपंग शिष्यवृत्तीचे प्रस्ताव सन २०१८-१९ मध्ये **DBT** पोर्टलमधून ऑनलाईन पध्दतीने भरुन त्याची एक प्रत (हार्डकॉपी) समाज कल्याण कार्यालय जिल्हा परिषद रत्नागिरीकडे सादर करणे बाबत वरील संदर्भिय पत्र क्रमांक एकने कळविणेत आलेले होते,परंतु दिनांक **१४.१.२०१९** रोजीचा ऑनलाईन रिपोर्ट पहाता जिल्हयातून केवळ **११** प्रस्ताव दाखल झालेले असून समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद रत्नागिरीकडे **आठ** प्रस्ताव ऑनलाईन दाखल झालेले आहेत.

संदर्भ क्रमांक एकचे पत्राने कळवून देखील आपल्या विद्यालयाकडून अपंग विद्यार्थ्यांचे प्रस्ताव सादर करणेत आलेले नाहीत ही बाब योग्य नसून अपंग विदयार्थ्यांच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती विषयक कामामध्ये प्रचंड दिरंगाई होत असलेचे दिसून येते. सदर प्रकरणी **मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी स्वतः आढावा घेवून तिव्र नाराजी व्यक्त केलेली आहे.**

तरी सदरचे पत्र मिळताच आपण सर्वांनी विद्यालयाच्या नोटीस बोर्डवर सदर शिष्यवृत्ती बाबत प्रचार व प्रसिध्दी करुन जे अपंग विदयार्थ्यी आहेत त्यांना वैयक्तिक माहिती देवून त्यांचा ऑनलाईन अर्ज भरुन व त्याची हार्डकॉपी समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी यांचे कार्यालयाकडे सादर करावी. प्रकरणी आपण केलेल्या कार्यवाही बाबत तसेच करत असलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल दिनांक **२५.०२.२०१९** पर्यंत न चुकता समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद रत्नागिरीकडे सादर करावा. तसेच सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या स्तरावरुन प्रचार व प्रसिध्दीसाठी कोणती कार्यवाही केली गेली याबाबतचा अहवाल सोबत सादर करावा.

जिल्हयातील कोणताही अपंग विद्यार्थ्यी सदर योजने पासून वंचित राहिल्यास किंवा वरिष्ठ कार्यालयाकडून तसेच मंत्रालय,आयुक्त कार्यालय यांचे कडून सदर प्रकरणी चौकशी झाल्यास यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यालयातील **लिपीक व प्राचार्य** यांची राहिल यांची सर्वांनी सक्त नोंद घ्यावी.

**सोबत :-** मा.आयुक्त,यांजकडील पत्राची प्रत.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

**प्रत - माहितीसाठी सविनय सादर.**

१. मा.आयुक्त,अपंग कल्याण,३ चर्च पथ,जीपीओच्या मागे,महाराष्ट्र,राज्य पुणे-४११००१.

२. मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,रत्नागिरी.

Regal College of Hotel Management and Tourism, Kondhe, Tal. Chiplun

Principal
Regal College of Hotel Management & Tourism
At Kondhe, Tal. Chiplun 415628

महाराष्ट्र शासन
- सामाजिक न्याय विभाग -

# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रत्नागिरी यांचे कार्यालय

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, कुवारबांव, ता.जि.रत्नागिरी
दूरध्वनी क्र. ०२३५२-२३०९५७. ई मेल : acsworatnagiri@gmail.com/asstcomsj.ratnagiri@maharashtra.gov.in

जा.क्र.सआसक/रत्ना/भाराशि/रिगल/२०२१-२२/ ९३२५ दिनांक:- २३.०९.२०२१

*अतिमहत्वाचे / तात्काळ*

प्रति,
1. मा. अध्यक्ष,
रिगल एज्युकेशन सोसायटी.
ता. चिपळूण. जि. रत्नागिरी
2. मा.प्राचार्य.
रिगल कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अ‍ॅन्ड टुरिझम. कोंडे
ता.चिपळूण. जि.रत्नागिरी

विषय : **भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क योजनेचे अभिलेखे उपलब्ध करून देणे बाबत..**

संदर्भ :
1. मा.प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. 1920 दि. 11.12.2020
2. मा.प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. 1902 दि. 22.12.2020
3. आपले पत्र क्र. 2020-21/40 दि. 26.12.2020
4. मा.प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. 195 दि. 22.01.2021
5. मा.प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. 287 दि. 03.02.2021
6. या कार्यालयाचे पत्र क्र.145 दि. 27.01.2021
7. या कार्यालयाचे पत्र क्र.826 दि. 16.06.2021
8. मा.प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. 1957 दि. 02.09.2021

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, दिनांक 25.11.2020 रोजी मा.प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण,मुंबई यांनी रत्नागिरी दौ-या दरम्यान आपल्या महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट दिली असता भेटी दरम्यान भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क या योजनांचे अभिलेखे तपासणी करिता उपलब्ध करण्याच्या सुचना देऊनही आपण अभिलेखे सादर केलेले नाही, याबाबत आपणास स्मरणपत्राद्वारे अवगत करूनही आपण महाविद्यालयाचे अभिलेखे सादर केलेले नाही.

याबाबत आपणांस खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले होते संदर्भ क्र 3 अन्वये आपण खुलासा सादर केलेला होता सदर चा खुलासा संदर्भ क्र. 6 अन्वये मा. प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण, मुंबई यांना आपण सादर केलेल्या कागदपत्रांसह पाठविण्यात आला होता परंतु सदर खुलासा व **कागदपत्रांमध्ये परीपूर्ण अभिलेखे उदा. विद्यार्थ्यांचे अर्ज,अनुषंगीक कागदपत्रे,उपयोगिता प्रमाणपत्रे,विद्यार्थ्यांची फी**



Regal College of Hotel Management and Tourism ★ Kondhe Tal. Chiplun

(P.T.O.)
Principal
Regal College of Hotel Management & Tourism
At Kondhe, Tal. Chiplun 415628

रीसीट,महाविद्यालयाचे प्रवेश प्रक्रियेबाबत कागदपत्रे,महाविद्यालयाचे मान्यतेबाबतचे कागदपत्रे. सक्षम प्राधीकरणाचे शिक्षण शुल्क मंजुरी बाबतचे कागदपत्रे सादर करणे अभिप्रेत होते. परंतु तसा अभिलेख सादर न करता दिशाभूल करणारी माहिती सादर केली असल्याचे मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग, मुंबई यांनी संदर्भिय पत्रांन्वये कळविले आहे. आपण जाणून बुजून दफ्तर तपासणीस उपलब्ध करून देत नसल्याचे निदर्शनास येत आहे.. ही बाब अतिशय गंभीर असून याबाबत सखोल तपासणी करुन अभिलेखे कार्यालयास सादर करण्याचे कळविले आहे.

संदर्भिय पत्र क्र. 8 अन्वये आपल्या महाविद्यालयाचे अभिलेखे पूरामध्ये वाहून गेल्याबाबतचा अहवाल सादर केल्याचे कळविले आहे. परंतू माहे नोव्हेंबर 2020 पासून आपणांस या कार्यालयामार्फत तसेच मा.प्रा.उपायुक्त कार्यालयामार्फत वारंवार पाठपूरावा करून देखील शिष्यवृत्तीचे अभिलेख दोन्ही कार्यालयास सादर केलेले नाही. माहे जुलै 2021 मध्ये अभिलेखे नैसर्गिक आपत्ती मध्ये नष्ट झाल्याचे दाखवून बनाव करीत असल्याचे या कार्यालयाची धारणा झालेली आहे. तरी आपण जाणून बुजून अभिलेखे सादर करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे दिसून येत आहे. आपण अभिलेखे सादर करण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे या कार्यालयाची तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील शिष्यवृत्तीच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सहाय्यक आयुक्त यांची असल्याने विनाकारण जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याचे विरष्ठ कार्यालयाची धारणा होत आहे. त्यामुळे आपणांस पुन:श्च सूचित करण्यात येते की, शिष्यवृत्तीच्या सर्व योजनांचा अभिलेख तात्काळ सादर करावा अन्यथा अनियमितता/ अपहारांची नोंद म्हणून आपल्या महाविद्यालयावर गुन्हा दाखल करून पुढील कारवाई करण्याचे वरिष्ठ कार्यालयास कळविण्यात येईल याची गांभिर्याने दखल घ्यावी.

आपला विश्वासू,

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, रत्नागिरी

प्रत: माहितीस्तव सविनय सादर

1. मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे.
2. मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचलनालय, पुणे,
3. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग, मुंबई.

Regal College of Hotel Management and Tourism ★ Kondhe Tal. Chiplun

Principal
Regal College of Hotel Management & Tourism
At Kondhe, Tal. Chiplun 415628

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण,**

**रुम नं.६१९, ६ वा मजला, कोकण भवन, (सीबीडी बेलापूर) नवी मुंबई-४००६१४**

**दुरध्वनी क्रमांक -०२२-२७५७६८०५/७५७५९७९ ई-मेल- dswomdiv@yahoo.in**

जा.क्र.प्राउसक/मुंवि/रत्नागिरी/रिगल कॉलेज /२०२०-२१/1902 दिनांक :- 22/12/2020

**स्मरणपत्र २**

प्रति,

प्राचार्य,

रिगल कॉलेज, घिपळून

कोंढे ता. चिपळून,

जि. रत्नागिरी.

विषय : भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क योजनेचे अभिलेखे उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भः १. या कार्यालयाचे पत्र क्र. कॅम्प रत्नागिरी ०१/ दि. २५.११.२०२०.

२. या कार्यालयाचे पत्र क्र. प्राउसक/मुंवि/रत्नागिरी/रिगल कॉलेज /२०२०-२१/१९२० दि. ११.१२.२०२०

दि. २५.११.२०२० रोजी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई यांनी त्यांचे रत्नागिरी दौऱ्या दरम्यान आपल्या महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट दिली.

उपरोक्त भेटी दरम्यान आपल्या महाविद्यालयाचे भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क योजनेचे अभिलेखे तपासणी करिता उपलब्ध करुन देण्याच्या सूचना देवूनही आपण अभिलेखे सादर केले नाहीत. संदर्भ क्र. २ अन्वये आपणांस याबाबत पुनश्च लेखी अवगत करुनही अद्याप आपल्या महाविद्यालयाचे लेखे या कार्यालयास प्राप्त नाहीत.

तथापी संदर्भ क्र. १ अन्वये सर्व अभिलेख पुढील ३ दिवसात प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई, कोकण भवन, बेलापूर जि. ठाणे यांचे कार्यालयात सादर न केल्यास आपल्या विरुध्द प्रशासकिय कार्यवाही करण्यात येईल याबाबतही आपणांस अवगत करण्यात आले होते. तसेच संदर्भ क्र. २ अन्वये शासन निर्णय क्र. इबीसी-२००३/प्र.क्र.३०१/मावक-२/ दि. १ नोव्हेंबर २००३ अन्वये अनुसूचित जाती साठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क देण्याची योजना याबाबत कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयान्वये मागासवर्गीय विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क देणेकामी महाविद्यालय दिरंगाई करत असल्यास याबाबत महाविद्यालयाच्या विरोधात योग्य ती कारवाई करण्याचे नमूद आहे याबाबत आपणांस पुर्वकल्पना देवूनही आपण सदर कामी जाणून बुजून याकामी दिरंगाई करत असल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी या पत्रांन्वये आपल्या महाविद्यालयाचे अभिलेखे या कार्यालयास उपलब्ध करुन देण्याकरिता दि. ३१.१२.२०२० पर्यंतची अंतिम मुदत देण्यात येत आहे. विहित मुदतीत अभिलेखे या कार्यालयास प्राप्त न झाल्यास आपल्या महाविद्यालया विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रादेशिक उपायुक्त,

समाज कल्याण, मुंबई विभाग

प्रत -

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रत्नागिरी.

प्राचार्य, रिगल कॉलेज, चिपळून यांचेशी तात्काळ संपर्क साधून महाविद्यालयाचे भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क योजनेचे अभिलेखे या कार्यालयास सादर करण्याकरिता पाठपुरावा करावा.

प्रादेशिक उपायुक्त,

समाज कल्याण, मुंबई विभाग

Serverdata/varsha B/letters to Assistant commissioner

Regal College of Hotel Management and Tourism ★ Kondhe Tal. Chiplun

Principal

Regal College of Hotel Management & Tourism

At Kondhe, Tal. Chiplun 415628

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन

- सामाजिक न्याय विभाग -

# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रत्नागिरी यांचे कार्यालय

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, कुवारबांव, ता.जि.रत्नागिरी

दूरध्वनी क्र. ०२३५२-२३०९५७, ई-मेल : acsworatnagiri@gmail.com / asstcomsj.ratnagiri@maharashtra.gov.in

---

जा.क्र.सआसक/रत्ना/भासशि/रिगल/२०२०-२१/ 2078 दिनांकः- २४.१२.२०२०

**अतिमहत्वाचे-**

2078

प्रति,

**मा.प्राचार्य, रिगल कॉलेज ऑफ**
**हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड टुरिझम, कोंडे**
**ता.चिपळूण, जि.रत्नागिरी**

**विषय :** **भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क योजनेचे अभिलेखे उपलब्ध करून देणेबाबत.**
**(सुनावणी दि.२८.१२.२०२० सकाळी ११.०० वा.)**

**संदर्भ :** मा. प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग मुंबई यांचे पत्र क्र.१९०२ दि. २२/१२/२०२०

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, दिनांक २५.११.२०२० रोजी मा. प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग मुंबई यांनी त्यांचे रत्नागिरी दौ-या दरम्यान आपल्या महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट दिली. भेटी दरम्यान भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क या योजनांचे अभिलेखे तपासणी करिता उपलब्ध करण्याच्या सुचना देऊनही आपण अभिलेखे सादर केलेले नाही, याबाबत आपणांस स्मरणपत्राद्वारे अवगत करूनही अभिलेखे सादर केलेले नाही. ही बाब अतिशय गंभीर असून आपण जाणून बुजुन दिरंगाई करत असल्याचे दिसून येत आहे.

***तरी, या पत्राद्वारे आपणांस सक्त ताकिद देण्यात येत आहे. तरी याबाबतचा आपला स्वयंस्पष्ट खुलासा तात्काळ या कार्यालयास सादर करावा. तसेच दि. २८.१२.२०२० रोजी आपण व्यक्तीश: व शिष्यवृत्तीचे काम करणारे कर्मचारी, कार्यालयीन अधिक्षक, संस्था अध्यक्ष यांनी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह या कार्यालयात सुनावणीकरीता सकाळी ११.०० वा. हजर रहावे.***

खुलासा न दिल्यास तसेच सुनावणीस अनूउपस्थित राहील्यास आपणा विरुध्द प्रशासकीय कारवाही प्रस्तावित केली जाईल याची गांर्भियाने दखल घ्यावी.

आपला विश्वासू ,

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, रत्नागिरी

Regal College of Hotel Management and Tourism ★ Kondhe Tal. Chiplun

Principal
Regal College of Hotel Management & Tourism
At Kondhe, Tal. Chiplun 415628

**प्रतः** मा. प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर

# Regal College of Hotel Management & Tourism

( Affiliated To University of Mumbai)

A/p. Kondhe, Guhagar Road, Tal. Chiplun, Dist. Ratnagiri. 415 628

Tel. (02355) 259393 / 258391/92

Email. regalcollegechiplun@gmail.com.  Web. www.regalcollege.co.in

REGAL
EDUCATION SOCIETY, CHIPLUN


जा.क्र.आर.सी/२२-२३/ ०५  दि. २४/०६/२०२२

प्रति,

मा.सहाय्यक आयुकत
समाज कल्याण,
कुवारबांव रत्नागिरी.

विषय:- समान संधी केंद्र (Equal Opportunity Center) ची स्थापना करणेबाबत.
संदर्भ:- जा.क्र.सआसक/रत्ना/भासशि/२०२२-२३/१५२८.दि.२४/०६/२०२२

महोदय,

उपरोकत विषयानुसार रिगल कॉलेज हॉटेल मॅनेजमेंट अॅण्ड टुरिझम, चिपळूण या महाविदयालयामध्ये विदयार्थ्याचा सर्वगीण विकास होण्याच्या दृष्टीकोनातुन विदयार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरिता खालील प्रमाणे समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

Equal Opportunity Center

| अ.क्र. | सभासदांची नावे | पदनाम | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| 1 | कु. सोनाली साठे | प्रभारी प्राचार्य | ७९७२७०४००६ |
| 2 | कु.कांचन सांवत | सहा.प्राध्यापक | ७३८७४०९८३० |
| 3 | सौ.पुजा सांवत | लिपीक | ७४९९११६८९९ |
| 4 | कु.राहुल धापसी | विदयार्थी प्रतिनिधी | ८०८०३२९८३९ |
| 5 | कु.दिक्षा मोरे | विदयार्थीनी प्रतिनिधी | ९३७३३४६७०३ |

Sonali
Principal
Regal College of Hotel Management & Tourism
At Kondhe, Tal. Chiplun 415628

Regal College of Hotel Management and Tourism
Kondhe Tal. Chiplun

Principal
Regal College of Hotel Management & Tourism
At Kondhe, Tal. Chiplun 415628

समता न्याय एकात्मता

महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

- सामाजिक न्याय विभाग -

# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रत्नागिरी यांचे कार्यालय

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, कुवारबांव, ता.जि.रत्नागिरी

दूरध्वनी क्र. 02352-230957, ई-मेल : acsworatnagiri@gmail.com / asstcomsj.ratnagiri@maharashtra.gov.in

जा.क्र.सआमक/रत्ना/भामशि/२०२१-२२/ 509 दिनांक - 08/03/2022

प्रति,

**मा. अधिष्ठाता / प्राचार्य / मुख्याध्यापक (सर्व)**

**जि. रत्नागिरी**

**विषय : महाविद्यालयातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची माहिती.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेल्या निर्देशानुसार सन 2021-22 साठी भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क इत्यादी बाबतचे नवीन व नुतनीकरणाचे अर्ज भरुन घेण्याची प्रकिया महाडीबीटीच्या https:/mahadbtmahait.gov.in चा ऑनलाईन पोर्टलवर सुरू झालेली आहे.

तथापी https:/mahadbtmahait.gov.in या ऑनलाईन पोर्टलवरील डॅशबोर्डनुसार अर्जाची स्थिती पाहता अद्यापही शिष्यवृत्तीचे अर्ज भरल्याचे दिसून येत नाही. सदरची बाब ही अतिशय गंभीर बाब आहे. तरी खालील प्रपत्रातील फक्त अनु. जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची माहिती या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | फक्त SC प्रवर्गातील विद्यार्थ्यांची माहिती | मागील वर्षीचे एकूण विद्यार्थी किती? सन २०२०-२१ | चालू वर्षीचे एकूण विद्यार्थी किती? सन २०२१-२२ | अजूनही अर्ज भरायचे राहिलेले विद्यार्थी किती? | अजूनही अर्ज न भरल्याची थोडक्यात कारण मिमांसा | भरलेले अर्ज का पाठविलेले नाहीत किंवा त्यासाठी येणा-या अडचणी | राहिलेले अर्ज किती दिवसांत पाठवणार? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | S.C | | | | | | |

आपला विश्वासू

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, रत्नागिरी

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१. मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -१
२. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग, मुंबई

Regal College of Hotel Management and Tourism ★ Kondhe Tal. Chiplun

E:\BOSS\D DRIVE\scholarship\College Letter.doc - 295 -

Principal
Regal College of Hotel Management & Tourism
At Kondhe, Tal. Chiplun 415628

महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ,

त्रुटींची पूर्तता केलेल्या संस्थांची यादी

सन २०२१-२२ साठी नूतनीकरण मान्यता देण्यात दिलेल्या संस्थेतील अभ्यासक्रम तपशील

| District | SR .NO. | INSTITUTE CODE | INSTITUTE NAME | सत्र २०२१-२२ नूतनीकरण मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | COURSE CODE | COURSE NAME | UNITS | INTAKE | शेरा |
| उस्मानाबाद | 8 | 230508 | ब्रिलियंट अपंग प्रशिक्षण कौशल्य विकास संस्था,आंबेवाडी (बेंबळी) ,ता.जि.उस्मानाबाद. | 302139 | सी सी ईन वायरमन हेल्पर | 1 | 25 | |
| उस्मानाबाद | | | | 305120 | सी सी ईन फळरोपवाटिका | 1 | 25 | |
| उस्मानाबाद | 9 | 230143 | माता येडेश्वरी कौशल्य विकास संस्था ,प्लॉट नं ४ ठाकरे नगर ,उस्मानाबाद मोबाईल क्रमांक ९४२३३३९७०७ | 304202 | सी सी इन बांधकाम पर्यवेक्षक | 1 | 25 | |
| मुंबई उपनगर | 10 | 020454 | व्हिजन टीचर्स अॅकॅडमी ऑफ स्कील डेव्हलपमेंट इस्टिट्यूट, व्हिजन चॅरिटेबल ट्रस्ट , सत्यभामा निवास, पहिला मजला, कस्तुरबा रोड क्र .१, बोरिवली (पूर्व)- मुंबई-४०००६६ | 411206 | सी.सी. इन प्रि स्कुल टिचर्स ट्रेनिंग | 2 | 50 | |
| रायगड | 11 | 040090 | रिगल कॉलेज ऑफ टेक्नोलॉजी,कुणबी भवन नवे नगर एस टी डेपोजवळ महाड जिल्हा रायगड ४०२३०१ | 415401 | डी.सी.इन हॉस्पीटॅलीटी मॅनेजमेंट | 1 | 25 | |
| रायगड | | | | 201226 | सी.सी.इन नर्सिंग केअर | 1 | 25 | |
| रायगड | | | | 304202 | बांधकाम पर्यवेक्षक | 1 | 25 | |
| रत्नागिरी | 12 | 050084 | नवनिर्माण शिक्षण कौशल्य विकास संस्था ,पी. ६३ एमआयडीसी,मिरजोळे,ता. जि.रत्नागिरी. | 415401 | हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट | 1 | 25 | |
| रत्नागिरी | 13 | 050167 | उत्कर्ष अॅकॅडमी ऑफ ग्लोबल करियर कौशल्य विकास संस्था,देवरुख,ता.संगमेश्वर ,जि.रत्नागिरी. | 401402 | हॉटेल ऑपरेशन | 1 | 25 | |
| रत्नागिरी | | | | 401208 | हॉटेल मॅनेजमेंट कॅटरिंग टेक्नॉलॉजी | 1 | 25 | |

Regal College of Hotel Management and Tourism ★ Kondhe Tal. Chiplun

Principal
Regal College of Hotel Management & Tourism
At Kondhe, Tal. Chiplun 415628

# रिगल कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड टुरिझम, चिपळूण

| अ.क्र. | महाविदयालयाचे नाव | फक्त एस.सी. प्रवर्गातील विदयार्थ्यांची माहिती | मागील वर्षीचे एकूण विदयार्थी किती ? सन २०२०-२१ | चालू वर्षीचे एकूण विदयार्थी किती ? सन २०२१-२२ | अजूनही अर्ज भरायचे राहिलेले विदयार्थी किती? | अजूनही अर्ज न भरल्याची थोडकयात कारण मिमांसा | भरलेले अर्ज का पाठविलेले नाहित किंवा त्यासाठी येणाऱ्या अडचणी | राहिलेले अर्ज किती दिवसांत पाठवणार? |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| 1 | रिगल कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड टुरिझम, चिपळूण | एस.सी. प्रवर्ग | २२ | ३१ | एक पण नाही. | ------------ | अर्ज पुढे पाठविलेले आहेत. | ------------ |
| 2 | रिगल कॉलेज ऑफ टेकनॉलॉजी, चिपळूण | एस.सी. प्रवर्ग | ०९ | १४ | एक पण नाही. | ------------ | अर्ज पुढे पाठविलेले आहेत. | ------------ |

Regal College of Hotel Management and Tourism ★ Kondhe Tal. Chiplun

Principal
Regal College of Hotel Management & Tourism
At Kondhe, Tal. Chiplun 415628

Regal College of Hotel Management & Tourism
(Affiliated to University of Mumbai)
A/p - Kondhe, Guhagar Road, Tal. Chiplun, Dist. Ratnagiri. 415 628.
Tel.: (02355) 259393 / 258391 / 92 / 93
Email - regalcollegechiplun@gmail.com, Web : www.regalcollege.in

REGAL
EDUCATION SOCIETY, CHIPLUN

## Declaration of Fee Year 2021-22

शासनाचे/विदयापीठाचे परिपत्रक क्र. UNIVERSITY OF MUMBAI No.CONCOL/Fee/194 चे संदर्भनुसार

### B.Sc Hospitality Studies (Non-Aided)

| Sr. No | Particular | First Year (UG) | Second Year (UG) | Third Year (UG) |
|---|---|---|---|---|
| 1 | Tuition Fee | 40000 | 40000 | 40000 |
| 2 | Development Fee | 0 | 0 | 0 |
| 3 | Admission Fee | 2000 | 2000 | 2000 |
| 4 | Examination Fee | 1937 | 1937 | 1937 |
| 5 | Enrollment Fee | 0 | 0 | 0 |
| 6 | Gymkhana Fee | 0 | 0 | 0 |
| 7 | Laboratory Fee | 5500 | 5500 | 5500 |
| 8 | Library Fee | 500 | 500 | 500 |
| 9 | Project Fee | 0 | 0 | 0 |
| 10 | Semister Fee | 0 | 0 | 0 |
| 11 | Session Fee | 0 | 0 | 0 |
| 12 | Study Tour | 0 | 0 | 0 |
| 13 | Other Fee | 3375 | 3375 | 3375 |
| | Total | 53312 | 53312 | 53312 |

मी प्राचार्य, सोनाली साठे, रिगल कॉलेज महाविद्यालय असे प्रमाणित करतो की.उपरोकत जाहिर केलेली फी ही विदयापीठ व शासन मान्यतेनुसार विदयार्थ्याकडून आकरली जाते व याची मी स्वत: खात्री केलेली आहे.तरीही चुकून जर एखादया विदयार्थ्यास शिष्यवृत्तीचा लाभ प्रदान होताना कमी अथवा जास्त फी प्रदान झाल्यास त्यास प्राचार्य या नात्याने मी सवत: जबाबदार राहीन.

आपला विशवासू,
Sonali प्राचार्य,
(प्राचार्याचे नाव)

Regal College of Hotel Management and Tourism, Kondhe, Tal. Chiplun

Principal
Regal College of Hotel Management & Tourism
At Kondhe, Tal. Chiplun 415628

महाराष्ट्र शासन

- सामाजिक न्याय विभाग -

## सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रत्नागिरी यांचे कार्यालय

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, कुवारबांव, ता.जि.रत्नागिरी

दूरध्वनी क्र. ०२३५२-२३०९५७, ई-मेल : acsworatnagiri@gmail.com / asstcomsj.ratnagiri@maharashtra.gov.in

---

जा.क्र.सआसक/रत्ना/भासशि/महाडिबीटी/२०२३--२४/ 2667 दिनांक: २६.०९.२०२३

अतिमहत्वाचे-

प्रति,
मा. प्राचार्य/अधिष्ठाता/संचालक/रजिस्ट्रार
सर्व महाविद्यालये,
रत्नागिरी

**विषय : सन २०२२-२३ चे महाविद्यालय व विद्यार्थी स्तरावर प्रलंबित अर्ज निकाली काढणेबाबत.**

**संदर्भ** : मा.आयुक्त समाजकल्याण विभाग महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दि २६.०९.२०२३ रोजीच्या व्हिडिओ कॉन्फरन्स बैठकीतील निर्देश.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, महाडिबीटी प्रणालीवर सन २०२२-२३ चे अनु. जाती, विजाभज, इमाव व विमाप्र या प्रवर्गाचे अर्ज महाविद्यालयीन स्तरावर प्रलंबित असल्याने मा.आयुक्त समाजकल्याण यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे त्यांनुषंगाने आपणांस सूचित करण्यात येते की,

| अ क्र | जिल्हा | अनुसूचित जातीचे महाविद्यालय स्तरावर प्रलंबित | विजाभज इमाव व विमाप्र चे महाविद्यालय स्तरावर प्रलंबित |
|---|---|---|---|
| 1 | रत्नागिरी | ८६ | ३२९ |

वरीलप्रमाणे सन २०२२-२३ मधील शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काचे अर्ज महाविद्यालयीन स्तरावर प्रलंबित दिसून येत आहेत. महाडिबीटी पुणे यांच्या सूचनेनुसार सन २०२२-२३ वर्षातील अर्जांसाठी online website ची अंतिम तारीख ३०.०९.२०२३ आहे त्यामुळे महाविद्यालयीन स्तरावरील व विद्यार्थीस्तरावर प्रलंबित अर्ज दि. २९.०९.२०२३ पर्यंत फॉरवर्ड केल्यास संबंधित विद्यार्थ्यांना फि अदा करता येईल, ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटी पुर्तते अभावी राहिले असतील अश्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी व्यक्तशी: संपर्क साधून त्यांचेकडून कागदपत्रांची त्रुटी पुर्तता करुन घ्यावी व दि २९.०९.२०२३ पर्यंत सर्व अर्ज या कार्यालयासा पाठवावेत दि ३०.०९.२०२३ पर्यंतच अंतिम तारीख असल्याने त्यांनतर येणारे सर्व अर्ज रजिक्ट होणार आहेत याची नोंद घ्यावी एकही मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहू नये याबाबत कटाक्षाने दक्षता घेण्यात यावी त्यामुळे क्लर्क व प्रिन्सिपल लॉगीन ला असणारे अर्ज पडताळणी करून दिलेल्या मुदतीत तात्काळ या कार्यालयास फॉरवर्ड करावेत. जेणेकरून दि ३०.०९.२०२३ पर्यंत या कार्यालयाकडून सदर अर्जांवर कार्यवाही करता येईल नंतर आलेले अर्ज अॅप्रुव्ह करता येणार नाहीत. विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित राहिल्यास व संबंधित विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

(यादव गायकवाड)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, रत्नागिरी

**प्रत: माहितीस्तव सविनय सादर.**

1. मा. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे-1
2. मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे.
3. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, मुंबई विभाग, मुंबई.
४.मा. प्रादेशिक उ पसंचालक समाजकल्याण, मुंबई विभाग, मुंबई.



Regal College of Hotel Management and Tourism, Kondhe, Tal. Chiplun

Principal
Regal College of Hotel Management & Tourism
At Kondhe, Tal. Chiplun 415628

महाराष्ट्र शासन
- सामाजिक न्याय विभाग -

# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रत्नागिरी यांचे कार्यालय

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, कुवारबांव, ता.जि.रत्नागिरी
दूरध्वनी क्र. ०२३५२-२३०९५७, ई-मेल : acsworatnagiri@gmail.com / asstcomsj.ratnagiri@maharashtra.gov.in

---

जा.क्र.सआसक/रत्ना/भासशि/महाडिबीटी /2022-23/ 601 दिनांक :-०८.०३.२०२३

व्हिडीओ कॉन्फरन्स- दि. ०९.०३.२०२३

प्रति,
प्राचार्य/अधिष्ठाता/संचालक/रजिस्ट्रार
सर्व महाविद्यालये, रत्नागिरी

विषय : व्हिडिओ कॉन्फरन्सला उपस्थित राहणेबाबत.
संदर्भ : मा.सहआयुक्त, समाज कल्याण पुणे यांचे दि.०८.०३.२०२३ रोजीच्या बैठकितील निर्देश

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, गुरुवार दि. ०९.०३.२०२३ रोजी सकाळी ठिक १०.३० या वेळेत गुगल मीट वर व्हिडिओ कॉन्फरन्स आयोजित करण्यात आली आहे. तरी सदर व्हिडिओ कॉन्फरन्सला उपस्थित रहावे. सदर meet.google.com/rdx-qugd-dwh लिंक वरून बैठकीस उपस्थित रहावे.

बैठकीमधील विषय पुढीलप्रमाणे-

1. सन २०२२-२३ मधील शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काचे महाविद्यालयीन स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्जाबाबत.
2. सन २०२२-२३ करीता महाडिबीटी पोर्टलवर अनुसुचित जाती या प्रर्वगातील भारत सरकार शिष्यवृत्ती शिक्षण शुल्क,परीक्षा शुल्क व निर्वाह भत्ता इ. योजनांचे अर्ज भरण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याबाबत.
3. आयत्यावेळचे विषय.

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, रत्नागिरी

प्रत: मा. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, मुंबई विभाग मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

Regal College of Hotel Management and Tourism ★ Kondhe Tal. Chiplun

Principal
Regal College of Hotel Management & Tourism
At Kondhe, Tal. Chiplun 415628

महाराष्ट्र शासन
सत्यमेव जयते
सामाजिक न्याय विभाग

# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रत्नागिरी यांचे कार्यालय

डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, कुवारबांव, ता.जि.रत्नागिरी
दूरध्वनी क्र. ०२३५२ २३०९५७, ई मेल : acswo.ratnagiri@gmail.com / asstcomsj.ratnagiri@maharashtra.gov.in

जा.क्र. स.आ.स.क./रत्ना/शिष्यवृत्ती/२०२३-२४/ 1513 दिनांक :02/०६/२०२३

प्रति,
प्राचार्य/ अधिष्ठाता,
सर्व महाविद्यालये,
जिल्हा रत्नागिरी

विषय : सन २०२२-२३ ई-स्कॉलरशीप बैठक
संदर्भ : मा. ना. श्री. उदय सामंत, मंत्री उद्योग तथा पालक मंत्री, रत्नागिरी यांचे दि. ०१.०६.२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्देश

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, मा. ना. श्री. उदय सामंत, मंत्री उद्योग तथा पालक मंत्री, रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली दि. ०१.०६.२०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी येथे झालेल्या सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात ई-स्कॉलरशीप विषयी आढावा बैठक संपन्न झाली. त्यामध्ये मा. मंत्री महोदयांनी सन २०२१-२२ व २०२२-२३ मधील शिष्यवृत्तीबाबत आढावा घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने दिनांक ६.०१.२०२३ रोजी दुपारी ०४.०० वा. या कार्यालयाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रत्नागिरी येथे खालील विषयांवर आयोजीत करण्यात आलेली आहे. तरी आपल्या महाविद्यालयामधील शिष्यवृत्ती विभागाचे कामकाज पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांसह आपण व्यक्तिशः आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित रहावे ही विनंती.

बैठकीचे विषय :

१) सन २०२२-२३ मधील नवीन अर्ज भरण्याबाबत
२) समान संधी केंद्र (Equal Opportunity Center) स्थापन करण्याबाबत
३) SIT बाबत आढावा.
४) आयत्यावेळचे विषय.

(यादव गायकवाड)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, रत्नागिरी

Regal College of Hotel Management and Tourism ★ Kondhe Tal. Chiplun

Principal
Regal College of Hotel Management & Tourism
At Kondhe, Tal. Chiplun 415628

महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

समता न्याय एकात्मता

- सामाजिक न्याय विभाग -

## सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रत्नागिरी यांचे कार्यालय

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, कुवारबांव, ता.जि.रत्नागिरी

दूरध्वनी क्रं. 02352-230957, ई-मेल : acsworatnagiri@gmail.com / asstcomsj.ratnagiri@maharashtra.gov.in

जा.क्र.सआसक/रत्ना/भासशि/२०२२-२३/ 1253 दिनांक- १८/०५/२०२२

**अत्यंत महत्तवाचे/ कालमर्यादा**

प्रति,

मा. अधिष्ठाता / प्राचार्य / मुख्याध्यापक (सर्व)
जि. रत्नागिरी

**विषय : भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क विजाभज, इमाव व विमाप्र या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेले अर्ज आपल्या स्तरावर मंजूर करणे बाबत.**

संदर्भ : १. या कार्यालयाचे जा. क्र. सआसक/रत्ना/भासशि/२०२१-२२/३८९ दि. २३/०२/२०२१

२. या कार्यालयाचे जा. क्र. सआसक/रत्ना/भासशि/२०२१-२२/४२१ दि. २५/०२/२०२२

३. या कार्यालयाचे जा. क्र. सआसक/रत्ना/भासशि/२०२१-२२/४५५ दि. ०३/०३/२०२२

४. या कार्यालयाचे जा. क्र. सआसक/रत्ना/भासशि/२०२१-२२/११७८ दि. ०९/०५/२०२२

महोदय,

उपरोक्त विषयान्वये मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेल्या निर्देशानुसार सन 2021-22 साठी भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क इत्यादी बाबतचे नवीन व नुतनीकरणाचे अर्ज भरुन घेण्याची प्रकिया महाडीबीटीच्या https:/mahadbtmahait.gov.in चा ऑनलाईन पोर्टलवर सुरू झालेली आहे, **असे संदर्भ क्र. १,२,३ आणि ४ च्या पत्रान्वये** आपणास वारंवार सूचित करण्यात आलेले आहे.

तथापी https:/mahadbtmahait.gov.in या ऑनलाईन पोर्टलवरील डॅशबोर्डनुसार अर्जाची स्थिती पाहता अद्यापही विद्यार्थ्यांचे अर्ज आपल्या स्तरावर (क्लर्क लॉगीन आणि प्रिन्सिपल लॉगीन) वर पलंबित असल्याचे दिसून येत आहे. **सदरची बाब ही अतिशय गंभीर आहे.** सन २०२१-२२ करीता महाडिबीटी पोर्टलवर **विजाभज, इमाव व विमाप्र** प्रवर्गातील भारत सरकार शिष्यवृत्ती शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व निर्वाह भत्ता इ. योजनांचे अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असल्याने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यास विलंब होत आहे.

तरी या पत्राद्वारे आपणास पुन:श्च सूचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज महाडिबीटी प्रणालीमध्ये तात्काळ भरण्यात यावेत व आपल्या स्तरावरील प्रलंबित अर्ज दि. १९.०५.२०२२ पर्यंत कार्यालयाकडे फॉरवर्ड करावेत. तसेच एकही पात्र विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती पासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेणेत यावी. विद्यार्थ्यांचे **अर्ज वेळेत न भरल्यास व पर्यायाने विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहिल्यास सर्वस्वी जबाबदार आपणास धरण्यात येईल.**

आपला विश्वासु

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, रत्नागिरी

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१. मा. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -१
२. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग, मुंबई

Regal College of Hotel Management and Tourism ★ Kondhe Tal. Chiplun

Principal
Regal College of Hotel Management & Tourism
At Kondhe, Tal. Chiplun 415628

महाराष्ट्र शासन
सत्यमेव जयते

समता न्याय एकात्मता

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

- सामाजिक न्याय विभाग -

# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रत्नागिरी यांचे कार्यालय

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, कुवारबांव, ता.जि.रत्नागिरी
दूरध्वनी क्र. ०२३५२-२३०९५७, ई-मेल : acsworatnagiri@gmail.com / asstcomsj.ratnagiri@maharashtra.gov.in

जा.क्र.सआसक/रत्ना/भासशि/महाडिबीटी/२०२१-२२/ 208

दिनांक .०१.२०२२
03/02/2022

प्रति,

प्राचार्य,

---------------------------------------------------

---------------------------------------------------

ता.------------------------, जि.रत्नागिरी

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज महाडिबीटी पोर्टलवर नोंदणीकृत करणे व महाविद्यालय स्तरावर प्राप्त झालेले / प्रलंबित असलेले आवेदनपत्रे तातडीने निकाली काढणेबाबत.

संदर्भ : १) मा. सहआयुक्त (शिक्षण) समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे पत्र क्र. सकआ/ शिक्षण/भासशि/डीवीटी/का-४ क/३६३२/२०२१-२२ दिनांक १६.१२.२०२१
२) या कार्यालयाचे पत्र क्र.१७७६, दि.१६.१२.२०२१
३) या कार्यालयाचे पत्र क्र.१८६०, दि.२९.१२.२०२१
४) या कार्यालयाचे पत्र क्र.०२, दि.०३.०१.२०२२
५) या कार्यालयाचे पत्र क्र.८६, दि.१७.०१.२०२२

वरील विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, आपणास अवगतच आहे की नविन शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता महाडिबीटी पोर्टलवरील विद्यार्थी, महाविद्यालयाचे लॉगीन दिनांक १४ डिसेंबर २०२१ रोजी सुरु करण्यात आलेले आहे. यामध्ये गतवर्षीच्या तुलनेत किमान २ महिन्याच्या विलंबानंतर दिनांक १४ डिसेंबर, २०२१ रोजी सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील शिष्यवृत्ती आवेदनपत्रे भरणेकरीता पोर्टल सुरु करण्यात आलेले आहेत. तेव्हा शैक्षणिक सत्र २०२१-२२ करीता मागासवर्गीय विद्यार्थी/महाविद्यालयांना प्रत्यक्षात केवळ ४५ कार्यालयीन दिवसांचाच कालावधी चालू वर्षातील अर्ज निकाली काढण्याकरीता मिळणार आहे.

त्यानुसार जिल्हयातील सर्व क.महाविद्यालय / व.महाविद्यालय व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे महाविद्यालयाचे प्राचार्य यांना संदर्भिय पत्र क्र. ०१ दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ पूर्वी भारत सरकार मॅट्रिकोत्तर व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रदाने योजना व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग/ इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे अधिनस्त असलेल्या महाडिबिटीवरील इतरही शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज विहित कालमर्यादेत निकाली काढण्याच्या सूचना देण्यांत आलेल्या आहे. तसेच सदर योजनेअंतर्गत जिल्हास्तरावरून अनुसूचित जाती/विजाभज/इमाव व विमाप्र अर्ज मुदतीत ऑनलाईन मंजूर करून निकाली काढण्याकरीता आपण सर्वानी नियोजनबध्द कामकाज व दैनंदिन अर्ज निकाली काढण्याचे लक्ष्य ठरवून आपल्या महाविद्यालय स्तरावर असलेल्या विद्यार्थी संघटना, विद्यार्थी पालक मित्र यांच्याशी वेळोवेळी समन्वय साधून सदर लक्ष्य विहित संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना देण्यांत वेळत पूर्ण करणे निश्चित साध्य होणार आहे. यापूर्वी अशा सूचना

Regal College of Hotel Management and Tourism, Kondhe Tal. Chiplun

Principal
Regal College of Hotel Management & Tourism
At Kondhe, Tal. Chiplun 415628

महाराष्ट्र शासन

- सामाजिक न्याय विभाग -

# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रत्नागिरी यांचे कार्यालय

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भुवन, कुवारबांव, ता.जि.रत्नागिरी

दूरध्वनी क्र. 02352-230957, ई-मेल : acsworatnagiri@gmail.com / asstcomsj.ratnagiri@maharashtra.gov.in

---

जा.क्र.सआसक/रत्ना/भासशि/इमाव अखर्चित रक्कम/2021-22/ 918 दिनांक :- 30.06.2021

01/07/2021

**स्मरणपत्र- 9**

**अतिमहत्वाचे/कालमर्यादा** – 05.07.2021

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/रजिस्ट्रार/अधीक्षक,

सर्व महाविद्यालये,

जि.रत्नागिरी

**विषय :** **सन 2011-12 ते सन 2017-18 (ऑनलाईन व ऑफलाईन) या शैक्षणिक वर्षातील महाईस्कॉल प्रणालीवरील अर्जाच्या मंजूर केलेल्या रक्कमांबाबत. (फक्त इमाव (OBC) प्रवर्गातील रक्कमांबाबत)**

**संदर्भ :**
1. या कार्यालयाचे पत्र क्र. 1701 दि. 22.07.2019
2. या कार्यालयाचे पत्र क्र. 1913 दि. 14.08.2019
3. या कार्यालयाचे पत्र क्र. 2029 दि. 27.08.2019
4. या कार्यालयाचे पत्र क्र. 2192 दि. 25.09.2019
5. या कार्यालयाचे पत्र क्र. 2209 दि. 26.09.2019
6. या कार्यालयाचे पत्र क्र. 2139 दि. 18.09.2019
7. या कार्यालयाचे पत्र क्र. 725 दि. 15.05.2020
8. या कार्यालयाचे पत्र क्र. 809 दि. 04.06.2020
9. या कार्यालयाचे पत्र क्र. 1651दि. 06.10.2020

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपले पुन:श्च लक्ष वेधण्यात येते की, **इमाव OBC या प्रवर्गाच्या भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क-परिक्षा शुल्क** या योजनेच्या शैक्षणिक वर्ष सन 2011-12 ते सन 2017-18 या वर्षातील रक्कमा आपणांस मंजूर करण्यात आलेल्या आहेत. त्या रक्कमाचे मंजूर आदेश (बी स्टेटमेंट व आदेश) आपणास वळोवेळी पाठविण्यात आलेले आहेत. आपल्या बँक खात्यावर जमा झालेल्या रक्कमा व या कार्यालयामार्फत देणेत आलेले मंजूरी आदेश यांचा ताळमेळ घेण्यात यावा. तसेच ज्या रक्कमा आपल्या महाविद्यालयाच्या बँक खाती व विद्यार्थ्यांच्या बँक खाती जमा झालेल्या नाहित अशा रक्कमांबाबत या कार्यालयास कळविण्यात यावे.

या कार्यालयाच्या बँक खाती इमाव प्रवर्गातील भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क -परिक्षा शुल्क या योजनांच्या रक्कमा (**मंजूर देयकातील अवितरीत रक्कमा**) बँक खाती पडून आहेत. **अशा रक्कमा आम्हांस शासनखाती भरावयाच्या आहेत.** तरी आपणांस मंजूर केलेली बी स्टेटमेंट,मंजूर आदेश व त्यामधील विद्यार्थी यांचा ताळमेळ घेण्यात यावा व रक्कमा जमा न झाल्यास तसे या कार्यालयास तात्काळ विहित बँक तपशीलासहित या कार्यालयाच्या ईमेल वर कळविण्यात यावे. हि आपणांस अंतिम संधी असून तद्नंतर प्राप्त होणाऱ्या पत्रांचा विचार केला जाणार नाही. आपले लक्ष वेधण्यात येते की, **हे पत्र महाडीबीटी म्हणजे सन 2018-19,2019-20 व 2020-21 या शैक्षणिक वर्षातील प्राप्त झालेल्या रक्कमांबाबतीत नाही.**

उपरोक्त सर्व बाबींची दखल आपण व्यक्तीश: घेणेत यावी व याबाबत आपल्या महाविद्यालयातील शिष्यवृत्तीचे काम करणारे कर्मचारी व कार्यालयीन अधिक्षक यांना सुचना द्याव्यात. **दि.05.07.2021हि अंतिम तारीख असून यानंतर आपले याबाबत काहीही म्हणणे नाही असे गृहित धरून आपल्या महाविद्यालयास मंजूर करण्यात आलेल्या बँक खाती पडून असलेल्या रक्कमा शासन खाती जमा करण्यात येतील.यापुढे कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद** घ्यावी. तद्नंतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून फी ची मागणी केल्यास त्यांच्या कागदपत्रांची अडवणूक केल्यास आपल्या महाविद्यालयावर कारवाई करण्यात येईल. कोणत्याही विद्यार्थी व पालकांची तक्रार आल्यास आपणास जबाबदार धरण्यात येईल.

**सदरचे पत्र इमेलद्वारे,व्हाट्सअँपग्रुप द्वारे आपणास पाठवीत आहोत.याची तातडीने दाखल घ्यावी.**

आपला विश्वासू,

सहाय्यक आयुक्त,

Principal
Regal College of Hotel Management & Tourism
At Kondhe, Tal. Chiplun 415628

Regal College of Hotel Management and Tourism ★ Kondhe Tal. Chiplun